तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : 10/एनजीपी/पदविका/2017/ ४९३३
दिनांक : 14 NOV 2017

प्रति,
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
चौथा मजला, बांद्रा (पुर्व),
मुंबई - 400 051.

विषय : राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनामधील व्दितीय व तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण यांचेकडे दि. 09.11.2017 रोजी परभणी येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकी दरम्यान सदर जिल्हामध्ये शासकीय तंत्रनिकेतनाची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्याकरिता मा. मंत्री महोदयांनी राज्यामध्ये सद्यस्थितीत सुरु असलेल्या सर्व तंत्रनिकेतनामधील प्रथम वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची सांख्यिकी माहिती तसेच व्दितीय व तृतीय वर्षामध्ये सद्यस्थितीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मा. मंत्री महोदयांना दोन दिवसात सादर करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने सदर पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील सर्व शासकीय तंत्रनिकेतनाबाबतची संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय व्दितीय व तृतीय वर्षामध्ये सद्यस्थितीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालील प्रपत्रात दोन दिवसात या संचालनालयास उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन मा. मंत्री महोदयांना सदर माहिती सादर करणे सुलभ होईल.

| अ. क्र. | शासकीय संस्थेचे नांव | शैक्षणिक वर्ष | अभ्यासक्रम | मंजुर प्रवेश क्षमता | व्दितीय वर्षामध्ये सद्यस्थितीत शिकत असलेल्या एकुण विद्यार्थ्यांची एकुण संख्या | तृतीय वर्षामध्ये सद्यस्थितीत शिकत असलेल्या एकुण विद्यार्थ्यांची एकुण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2017-18 | | | | |
| 2 | | 2016-17 | | | | |
| 3 | | 2015-16 | | | | |

(डॉ सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत:- सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक, पुणे यांना

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/सुचना/२०१७/ 2572
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 15 NOV 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य,सर्व शासकीय पदविका संस्था अमरावती विभाग अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.